# ज.भ.शि.प्र.मंडळाचे कला व विज्ञान महाविद्यालय शिवाजी नगर गढी

समाजशास्त्र विभाग
प्रा.डाॅ.आर.डी. खताळ

# समाजिक संशोधन पद्धती

## * तथ्याची वैशिष्ट्ये :-

# * तथ्य* 'जसे आहे तसे.’




- तथ्य म्हणजे वस्तुस्थिती किंवा सत्य घटना
- 'तथा' या शब्दापासून तथ्य हा शब्द बनला आहे. 'तथा'चा अर्थ 'जसे आहे तसे.’
- सत्य स्वरूपातून प्रकट करण्याच्या प्रक्रियेला तथ्य असे म्हटले जाते.
- सामाजिक घटनाकडे जाणीवपूर्वक लक्ष द्यावे लागते
- गुड आणि  हॅट , म्हणतात, की

"ज्या निरीक्षणाचा मानवी संवेदनांनी पडताळा पाहता येतो अशी माहिती म्हणजे तथ्य होय."

# * तथ्य*

- घटनाचे स्वरूप अनुभवक्षम असेल तरच त्या घटनेचा तथ्य म्हणून स्वीकार केला जाऊ शकतो.
- अनुभवाधिष्ठित असल्यामुळे तथ्याची प्रचीती आवश्यक असते.
- तथ्यांचा पडताळा अगर अनुभव जर इंद्रियाद्वारे घेता येत असेल तर त्यांना शास्त्रात प्रवेश असतो.
- तथ्याचे स्वरूप हे अनुभव  किंवा पडताळा निकषावर अवलंबून असते.
- सत्य शोधून काढण्यासाठी निरीक्षण करावे लागते.
- तथ्याचा शोध निरीक्षणापासून सुरू होत असतो
- संशोधकाला घटनेचे कारण शोधून काढण्यासाठी अत्यंत जागरूक राहावे लागते.
- अर्थपूर्ण नि समर्थक अशी माहिती संशोधकांनी तथ्य संकलनातून मिळवावी अशी अपेक्षा असते.
- निरीक्षणातून पाहता येतो त्यालाच तथ्य असे म्हटले जाते.

# *तथ्याची वैशिष्ट्ये :-

- १) तथ्य वास्तवात प्रचीतीला येणारी एक घटना प्रक्रिया, कारक किंवा गोष्ट असते.
- २) तथ्याला कोणत्याही प्रकारे पाहणे, समजण, अनुभव घेणे वा जाणून घेणे शक्य असते.
- ३) तथ्यात कोणत्याही परिस्थितीत सत्यता असते.

# *तथ्याची वैशिष्ट्ये :-

(४) तथ्याची सत्यता ही वास्तविकतेवर आधारित असते. प्रचलित अवस्थेत घडणाऱ्या घटनांची जशी सत्यता जाणवते तशीच घडून गेलेल्या घटनाची अनुभव घेण्यासाठी कारण शोधण्याची येथे संधी असते.

- ५) तथ्यासाठी जेव्हा एका अनुभवातून तथ्य माहीत होते तोच अनुभव दुसरीकडेसुद्धा तथ्य माहीत करून घेण्यासाठी उपयोगी पडतो नि शिवाय आहे त्य अनुभवात वृद्धीसुद्धा होत असते

## *तथ्याची वैशिष्ट्ये :-

- ६) एखादी गोष्ट वा घटना जेव्हा सत्य म्हणून स्वीकारली जाते तेव्हा तिच्या बाबतीत अनेक लोकांचे एकमत बनत असते.

- ७) कोणत्याही एका घटनेची किंवा प्रक्रियेची पूर्ण व्याख्या तथ्य करीत नसते. कारण तथ्य त्या घटना किंवा प्रक्रियांच्या एका अंगाचे स्पष्टीकरण करीत असते. म्हणजे व्यापक नि गुंतागुंत असलेल्या प्रक्रियातून कोणत्यातरी एका बाबीला अलग करण्याचे काम तथ्य करीत असते.

# *तथ्याची वैशिष्ट्ये :-

- ८) सगळ्याच तथ्यांना प्रत्यक्षरूपात बघणे शक्य नसते. परंतु याचा अर्थ असा नाही की त्यांच्या अस्तित्वाच्या बाबतीत अनुभव घेऊ नये. जी तथ्ये मिळत नाहीत त्यांचा शोध घेण्याचे काम संशोधकाला करावे लागते.

- ९) शास्त्रीय अध्ययनात जी तथ्ये उपयोगात आणली जातात ती अर्थपूर्ण तथा सैद्धांतिक स्वरूपाची असतात. कारण त्यांची निवड अत्यंत काळजीपूर्वक केली जाते. ही निवड विशिष्ट नि निश्चित उद्दिष्टांना समोर ठेवून केली जात असते.

# *तथ्याची वैशिष्ट्ये :-

- १०) संशोधनप्रक्रियेत प्रत्येक तथ्याचा पडताळा बघितला जात असतो. म्हणजे पुनर्परीक्षण केल्याशिवाय तथ्याना शास्त्रीय बैठक प्राप्त होत नसते. संशोधक यादृष्टीने काळजी घेत असतो.

- ११) तथ्यांचे संकलन करण्यासाठी निरीक्षणाची गरज असते. म्हणजे निरीक्षणापासून तथ्य संकलन करण्याचे काम सुरू होत नसते.